# आदर्श विद्यालयात सायबर जागरूकता

## क्विक हील, 'पाटकर-वर्दे'च्या विद्यार्थ्यांकडून मार्गदर्शन

मालाड, ता. २४ (बातमीदार) : डिजिटल सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी, सायबर सुरक्षा सक्षम करण्यासाठी गोरेगाव येथील आदर्श विद्यालय मराठी माध्यम येथे बुधवारी (ता. २२) क्विक हील फाउंडेशन आणि पाटकर-वर्दे महाविद्यालय यांच्या तर्फे संवादपर सायबर सुरक्षा जागरूकता सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हे प्रमुख अभियान आयोजित करण्यात आले होते. 'माझा डेटा, माझी जबाबदारी' या यंदाच्या मुख्य संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाने वैयक्तिक डिजिटल ठसे सुरक्षित ठेवण्यासाठी वैयक्तिक मालकी आणि पूर्वकाळजीयुक्त उपायांचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमात प्रशिक्षित विद्यार्थी सायबर वॉरियर्स वेदांत रत्नाकर गोसावी आणि साहिल संजय ढेबे यांनी केले.



सायबरविषयी मार्गदर्शन केले.

सत्रादरम्यान सायबर वॉरियर्सनी विद्यार्थी आणि शिक्षकांना डेटा संरक्षण आणि गोपनीयता, ऑनलाइन फसवणूक ओळखणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, सायबर गुन्ह्याची नोंद/तक्रार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.